A-6517/2022

(22)

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2021 ◐

BK 352021

15 JUN 2022

उपकोषागार अधिकारी, खेड

NOTARY BALASAHEB T. THOPATE PUNE DIST. MAHARASHTRA R. NO. 3269 Expiry Date 23/12/2025 GOVT. OF INDIA

# हमीपत्र

हमीपत्र आज दि. १५/०७/२०२२ इसवी दिवशी आम्ही १. श्री. मोहनलाल धर्माजी बिश्नोई, वय. वर्षे, धंदा. शेती व व्यापार, २. श्री. मोहनलाल विरमाराम बिश्नोई, वय. वर्षे, धंदा. शेती व व्यापार, दोघेही रा. सर्व्हे नंबर ८७/१२, बिश्नोई सदन, विरभद्र नगर, बानेर, गणराज मंगल कार्यालयाजवळ, पुणे सिटी, पुणे ४११०४५ येथील रहिवाशी असून सत्यप्रतिज्ञेवर हमीपत्र करतो की,

आम्ही गाव मौजे मुलखेड, ता. मुळशी, जि. पुणे, येथील भुखंड क्रमांक गट नंबर १८८, क्षेत्र ००हे ५८.५० आर, पो. ख. ००हे ०२ आर, एकुण क्षेत्र ००हे ६०.५० आर, आकार ०२रू. २० पैसे या मिळकतीमधील वाणिज्य/ औदयोगिक पद्धतीच्या भूखंड बांधकामाबाबत प्रस्ताव जागामालक म्हणून मी/आम्ही दाखल केला आहे .

१) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे कडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही.याची माहिती मला /आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणून जागेवरील बोरद्वारापाणी उपलब्ध करून देण्याची किंवा टकरद्वारे पाणी मिळण्याची व्यवस्था करीत आहोत.व त्यासंबधी आवश्यक त्या वरिष्ठ भुवैज्ञानिक अधिकारी भूजल सर्व्हेक्षण आणि विकास योजना (G.W.S AND D.A) या कार्यालय मार्फत किंवा तत्सम तांत्रिक सल्लागारामार्फत सदर जागी पाणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणून देण्याची कार्यवाही करणे आमच्यावर बंधनकारक राहील

२) इमारत पूर्ण झाल्यावर इमारतीमधील निवासी /बिगर निवासी वापरासाठी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे पिण्यासाठी पुरेश दावाणे करू शकत नसल्यास पाण्याची पर्यायी व्यवस्थ प्रवर्तक या नात्याने इमारतीमधील रहिवाशांना मी /आम्ही करून देण्यास तयार असून त्याची सर्व जबाबदारी मी /आम्ही हमिपात्राद्वारे स्वीकारत आहे .पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे मार्फत कोणताही पाणी पूरवठ न झाल्यास किंवा अपुरा झाल्यास मी. / आम्ही कोणत्याही कोर्टाकडे याबाबतीत दावा दाखल करणार नाही .

३) निवासी अगर व्यापारी गाळयांचे विक्रीचे करताना येणाऱ्या करारनामामध्ये पाणी पुरवठ्याची वरील प्रमाणे सर्व वस्तूस्थितीची जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतरसुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंग नंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे चा पुरेशा पाणी पुरवठा सुरु होईपर्यंत माझ्या /आमच्या खर्चाने पुरेशा पाणी पुरवठा करून देण्याची माझी /आमची जबाबदारी राहील.

४) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण निवासी अगर व्यापारी गाळयांचे विक्रीचे करताना येणाऱ्या करारनामामध्ये पाणी पुरवठ्याची वरीलप्रमाणे सर्व वस्तूस्थितीचे जाणीव नियोजित गाळेधारकांना करून दिल्यानंतर सुद्धा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंग नंतर होणाऱ्या नियोजित गाळेधारकांना पाणी पुरवठा अपुरा झाला तर पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे चा पुरेशा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत माझ्या /आमच्या खर्चाने पुरेशा पाणी पुरवठा करून

देण्याची माझी /आमची जबाबदारी राहील. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे ला तोषीस लागू देणार नाही.

५) टकरद्वारे किंवा बोअरद्वारे सध्या मिळणाऱ्या पाण्याचे नमून वेळोवेळी प्रयोग शाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास पाणी वापरण्यास येईल. याची मी / आम्ही काळजी घेईन/ घेवू.

६) सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक / मालक या नात्याने मी /आमचे अन्य कोणास भविष्य काळात विकल्यास नवीन मालक / प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबीचे लेखी कल्पना देईन त्याचा समावेश नवीन करारनाम्यातील करण्यात करण्यात येईल याची हमी घेईन / घेवू

७) हे हमीपत्र माझे / आमची वालीवारसांवर बंधनकारक राहील

८) सदर भूखंडामधील संदर्भातील कोणत्याही करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल. व हे हमीपत्र करारनाम्यातील विशेष बाब म्हणून समजण्यात येईल

वरील हमीपत्र मी /आम्ही राजीखुशीने दि. १५/०७/२०२२ रोजी लिहून दिले आहे.

दि. १५/०७/२०२२

हमीपत्र लिहून देणार



१. श्री. मोहनलाल धर्माजी बिश्नोई

२. श्री.मोहनलाल विरमाराम बिश्नोई



Noted & Registered at Serial Number A-6517 Date: 2022

BEFORE ME

BALASAHEB T. THOPATE
NOTARY GOVT. OF INDIA
BHOSARI, PUNE-39